प्रेसनोट

दि. २४/०७/२०१७ रोजी १७.३० वा.चे सुमारास सुनिल विलास दनाने, वय २५ वर्ष, रा. खडकवासला, पुणे याने आपले एक वर्षाच्या मुलीसह खडकवासला धरणातुन पाणी सोडलेल्या मुठा नदीच्या पाण्यात उडी मारली होती. दि. २४/०७/२०१७ रोजी रात्रौ २१.०० वाजेपर्यंत अग्नीशामक दलाचे मदतीने त्यांचा शोध घेतला. परंतु ते मिळुन न आल्याने शोध मोहिम थांबवुन दि. २५/०७/२०१७ रोजी पुन्हा शोध मोहिम सुरु केली असता सुमारे १२.०० वा.चे सुमारास एक अनोळखी पुरुषाचा मृतदेह अंगावर फक्त अंडरवेअरसह मिळुन आला. सदरचा मृतदेह शवविच्छेदनाकरीता ससुन रुग्णालयात नेलेनंतर मृतदेहाची ओळख पटली असुन सदरचा मृतदेह हा संदिप खंडु भिसे, वय ४० वर्ष, मारुती रेसिडेन्सि, दामिनी लॉन्स मंगल कार्यालयाजवळ, कोंढवे-धावडे, पुणे याचा असल्याचे निष्पन्न झाले आहे. आज दि. २६/०७/२०१७ रोजी तीन डॉक्टरांचे पथकाने मृतदेहाचे शवविच्छेदन केल्यानंतर सदर इसमाचा गळा आवळुन खून करुन मृतदेह नदीच्या पाण्यात टाकुन दिल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर मृतदेहाचा अंत्यविधी झाल्यानंतर मयत इसमाचा मुलगा नामे अमर संदिप भिसे, वय १८ वर्ष, रा. मारुती रेसिडेन्सि, दामिनी लॉन्स मंगल कार्यालयाजवळ, कोंढवे-धावडे, पुणे याने दिलेल्या तक्रारीवरुन उत्तमनगर पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ६५/२०१७, भा. दं. वि. कलम ३०२, २०१ प्रमाणे आज दि. २६/०७/२०१७ रोजी दुपारी १५.०५ वा. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचे अधिक तपासात खब-यांमार्फत गोपनीय माहिती काढली असता मयत इसमाची पत्नी व इसम नामे सतिश वामन देडगे वय ५० वर्ष, रा. देडगे वस्ती, नांदेड, ता. हवेली, जि. पुणे याचे अनैतिक संबंधाचे कारणावरुन सतिश वामन देडगे याने दि. २४/०७/२०१७ रोजी संदिप खंडु भिसे याचां गळा आवळुन खून करुन त्याचा मृतदेह खडकवासला धरणाचे पुलावरुन मुठा नदीच्या पुराच्या पाण्यात टाकुन दिल्याचे तपासात निष्पन्न झालेने श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री बसवराज तेली, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, पुणे शहर, श्री किशोर नाईक, सहा. पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे शहर, श्री कल्याणराव विधाते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उत्तमनगर पोलीस ठाणे, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री कवीदास जांभळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री पिंगळे, सहा. पोलीस निरीक्षक, श्री हेमाडे, पोलीस उपनिरीक्षक, तसेच तपास पथकाचे श्री दत्तात्रय कोल्हे श्री कामठे, सहा. पो. उपनिरीक्षक, श्री वायदंडे, सहा. पो. उपनिरीक्षक, पो. हवा. २४११ सुर्यवंशी, पो. ना. ६५९५ ठाकुर, पो. शि. ८१५९ ताकवणे, पो. शि. ७४२१ ढमढेरे यांनी आरोपी सतिश वामन देडगे याचा शोध घेवुन त्यास शिताफिने पकडुन सदर गुन्हयात दि. २६/०७/२०१७ रोजी १९.१५ वा. अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील अधिक तपास श्री कवीदास जांभळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) हे करीत आहेत.